*धनगर समाज संघर्ष समिती, परभणी जिल्हा यांच्या वतीने अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा सत्कार...*
================================================================

गेली अनेक वर्षे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या धनगर समाजाच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने विविध 22 योजना राबविण्याचा संकल्प जाहीर करत यासाठी 1 हजार कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात जाहीर केल्याबद्दल धनगर समाज संघर्ष समिती, परभणी जिल्हा यांच्या वतीने अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा मंत्रालयात सत्कार करण्यात आला.
संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री. आनंद बनसोडे व श्री. अभय चाटे, श्री. गणेशराव रोकडे, श्री. गणेशराव घोरपडे, श्री. बाळासाहेब गिराणा, श्री. तुकाराम पाटील आदि पदाधिका-यांनी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेत त्यांचे आभार व्यक्त केले व सत्कार केला. धनगर समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा शासनाचा दृढसंकल्प असून धनगर समाज बांधवांच्या पाठीशी शासन भक्कमपणे उभे असल्याची ग्वाही अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी दिली.